सकाळ | पुणे जिल्हा ★★

उद्योगविश्व

TODAY ११

सकाळ : पुणे जिल्हा, रविवार, १०।१०।२०१०

# विद्या प्रतिष्ठानमध्ये प्रगत वेल्डिंग तंत्रज्ञान वर्ग

**बारामती** : अभियांत्रिकी क्षेत्रातील बदलांचे ज्ञान विद्यार्थ्यांना देण्याच्या उद्देशाने विद्या प्रतिष्ठानने बारामतीत अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हील इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आदी पदवी अभ्यासक्रम येथे सुरू करण्यात आले आहेत. महाविद्यालयास 'अ' दर्जा प्राप्त झाला असून, आयएसओ ९००१:२००० हे गुणवत्ताविषयक प्रमाणपत्रही महाविद्यालयाने मिळविले आहे.

उच्च दर्जाच्या प्रयोगशाळा व वर्कशॉप्सचा उपयोग केवळ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांपुरताच मर्यादित राहू नये, तर समाजातील अकुशल युवकांनाही व्हावा, या हेतूने अल्प कालावधीच्या कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम अत्यल्प शुल्क व गरजूंना विद्यावेतन देऊन सुरू करण्याचा निर्णय संस्थेने घेतल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. बी. देवसरकर यांनी दिली.

याचाच एक भाग म्हणून अकुशल युवकांसाठी 'प्रगत वेल्डिंग तंत्रज्ञान अभ्यासक्रम' लवकरच सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ज्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याची इच्छा आहे, त्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा किंवा ०२११२-२३९५०३ या क्रमांकावर संपर्क साधावा.